खेलो इंडिया यूथ गेम्समध्ये महाराष्ट्राच्या पोरांची कमाल!

# पुरूष खो-खो संघ सलग पाचव्यांदा चॅम्पियन

**मुंबई : वृत्तसंस्था**

युवा कर्णधार नरेंद्र कातकडे, आदित्य कुडाळे आणि निखिल यांनी सर्वोत्तम अष्टपैलू कामगिरी करत सोनेरी यशाची घोडदौड कायम ठेवली. नरेंद्रच्या नेतृत्वात महाराष्ट्राचा खो-खो संघ पाचव्या सत्रातील खेलो इंडिया मध्ये सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. यासह महाराष्ट्र संघाने आपले निर्विवाद वर्चस्व राखत सलग पाचव्यांदा चॅम्पियन होण्याचा बहुमान पटकावला आहे. महाराष्ट्र संघाने फायनल मध्ये शुक्रवारी दिल्ली संघाला धूळ चारली. महाराष्ट्र संघाने ३८-२८ असा दहा गुणांच्या आघाडीने अंतिम सामना जिंकला. यासह महाराष्ट्राचा पुरुष खोखो संघ सलग पाचव्यांदा सुवर्णपदक विजेता ठरला. यादरम्यान महाराष्ट्र महिला खो-खो संघ रौप्य पदकाचा मानकरी ठरला. महाराष्ट्र संघाला अंतिम फेरीत ओडीसा विरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला.ओडिसा संघाने शुक्रवारी महाराष्ट्र महिला खो-खो संघाची खेलो इंडिया युथ गेम्स मधील सुवर्ण यशाची मोहीम रोखली. ओडिसा संघाने अवघ्या तीन गुणांच्या आघाडीने फायनल मध्ये चार वेळच्या सुवर्णपदक विजेत्या महाराष्ट्र संघाचा १६-१३ ने पराभव केला. त्यामुळे जानवी पेठेच्या नेतृत्वात महाराष्ट्र संघ रौप्य पदकाचा मानकरी ठरला. ओडिसा संघाने पहिल्यांदा खेलो इंडिया युथ गेम्स मध्ये चॅम्पियन होण्याचा बहुमान पटकावला आहे.



सलग पाचव्यांदा चॅम्पियन होण्याच्या इराद्याने मैदानावर उतरलेल्या महाराष्ट्र संघाने दमदार सुरुवात केली. त्यामुळे संघाला पहिल्या डावामध्ये आघाडी घेता आली. नरेंद्र याच्या नेतृत्वात खेळाडूंनी स्वरूप कामगिरी करत पहिल्या डावात १८-१७ अशी आघाडी मिळवली होती. आपले वर्चस्व राखून ठेवत महाराष्ट्राने दुसऱ्या डावातही दिल्ली संघाचा विजयाचा प्रयत्न हाणून पाडला. यादरम्यान महाराष्ट्र संघाने २०-१८ असा स्कोर करत अंतिम सामना आपल्या नावे केला. यादरम्यान करणार




नरेंद्र ने चार गडी बात करत १:३० मिनिटे पळतीचा खेळ केला. तसेच निखिलने संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. त्याने चार गडी बाद केले.

**कुटील डावपेच दिल्लीच्या अंगलट; कलेक्टर आयुक्तांच्या उपस्थितीत रंगला सामना**

किताब जिंकण्याच्या इराद्याने दिल्ली संघाने कुटील डावपेच करत उपांत्य सामना जिंकला. यादरम्यान पंचांच्या चुकीच्या निर्णयाचा मोठा फटका पश्चिम बंगाल संघाला बसला मात्र याच कुटील डावपेचातून दिल्ली संघाने उपांत्य सामना जिंकत फायनल मध्ये धडक मारली होती. दिल्ली संघाचे हे कुटील राजकारण हाणून पाडण्यासाठी अंतिम सामन्या दरम्यान महाराष्ट्र संघाने स्थानिक कलेक्टर आणि आयुक्तांना खास निमंत्रित केले होते. त्यांच्या उपस्थितीत हा अंतिम सामना रंगला. यादरम्यान महाराष्ट्राच्या खेळाडूंनी खो-खोच्या खेळातील आपले वर्चस्व सिद्ध करत सामन्यात दणदणीत विजय संपादन केला.

**महाराष्ट्र खो-खो संघाची गौरवशाली कामगिरी: दिवसे**

मध्यप्रदेश येथील खेलो इंडिया युथ गेम्स मध्ये महाराष्ट्राच्या महिला व पुरुष खो खो संघांनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे. महाराष्ट्राच्या पुरुष खो-खो संघाने मिळवलेले सोनेरी यश गौरवशाली आहे. महिला संघाने सर्वोत्कृष्ट कामगिरी केली. त्यामुळे खो खो या खेळ प्रकारात महाराष्ट्राला आपले वर्चस्व गाजवतात, अशा शब्दात क्रीडा आयुक्त सुहास दिवसे यांनी महाराष्ट्राच्या संघावर कौतुकाचा वर्षाव केला.

# बीबीसीच्या डॉक्युमेंट्री बंदीबाबत सर्वोच्च न्यायालयाची केंद्राला नोटीस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

'इंडिया द मोदी क्वेश्चन' ही बीबीसीची डॉक्युमेंटरी प्रदर्शित झाल्यापासून वादात आहे. केंद्र सरकारने ही डॉक्युमेंटरी यूट्युबवरुन हटवली असून ट्विटरवर देखील कोणी प्रसारित करू नये अशी बंदी घालण्यात आली आहे. केंद्र सरकारकडून घालण्यात आलेल्या डॉक्युमेंटरीवरील बंदीचे प्रकरण थेट कोर्टात पोहोचले असून सर्वोच्च न्यायालयाने याबाबत केंद्र सरकारला नोटीस पाठवली आहे.



बीबीसीच्या माहितीपटावरील बंदी उठवण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च दाखल करण्यात आली आहे. ज्येष्ठ पत्रकार एन राम, तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा आणि वकील प्रशांत भूषण यांनी याचिका दाखल केल्या आहेत. यावर आज न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि एमएम सुंदरेश यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांनी याबाबतचे ट्वीट ट्विटरवरून हटवण्याचा मुद्दाही उपस्थित केला. त्यानंतर न्यायालयाने केंद्राला याबाबतची नोटीस पाठवली आहे.

ज्येष्ठ वकील सीयू सिंह यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकाकर्त्याची बाजू मांडली. ''सरकारने आणीबाणीच्या अधिकारांचा वापर करून याचिकाकर्त्यांचे ट्वीट ट्विटरवरून काढून टाकले. त्यावर न्यायमूर्ती खन्ना यांनी विचारले की, यासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका का दाखल केली नाही? यावर सिंह यांनी उत्तर दिले की, सरकारने ज्या आयटी नियमांतर्गत ही कारवाई केली आहे ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे, असा युक्तीवाद वकीलांनी केला.

सिंह यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खंडपीठाने केंद्र सरकारला नोटीस बजावत असल्याचे सांगितले. या प्रकरणाची पुढील सुनावणी एप्रिलमध्ये होणार आहे. यावर सिंह यांनी सुनावणी लवकर घेण्याची मागणी केली. ''देशभरातील लोकांना माहितीपट पाहण्यापासून रोखले जात आहे. त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी लवकरात लवकर घ्यावी अशी विनंती करत असल्याचे सिंह यांनी म्हटलं.

यावर न्यायमूर्ती खन्ना यांनी लोक अजूनही ही डॉक्युमेंट्री पाहत असल्याचे सांगत न्यायमूर्तींनी पुढील सुनावणीची तारीख लवकर घेण्यास नकार दिला, ''आम्ही अलीकडचीच तारीख देत आहोत. केंद्र सरकारची बाजून न ऐकता आम्हाला या प्रकरणी कोणताही आदेश काढायचा नाही. केंद्राला तीन आठवड्यांची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर पुढील दोन आठवड्यात याचिकाकर्ते केंद्राच्या उत्तरावर त्यांचे उत्तर देऊ शकतात, असे केंद्र सरकारने म्हटले आहे.

# खेलो इंडिया स्पर्धेसाठी डॉ. मुकुल खुटाळे यांची महाराष्ट्र संघाबरोबर फिजिओथेरपिस्ट म्हणून नियुक्ती

**फलटण : प्रतिनिधी**

केंद्र शासन क्रीडा विभागामार्फत पाचव्या खेलो इंडिया गेम्स मध्यप्रदेश २०२२ अंतर्गत भोपाळ (मध्यप्रदेश) येथे विविध खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेमधील कानोईग अँड कयाकिंग या खेळ प्रकारासाठी फलटणचे सुपुत्र डॉ. मुकुल महेश खुटाळे यांची आयुक्त, क्रीडा व युवकसेवा संचलनालय पुणे यांनी फिजिओथेरपिस्ट पदी नियुक्ती केली आहे.



डॉ. मुकुल खुटाळे हॉकी प्रशिक्षक आणि बीडचे तालुका क्रीडाधिकारी महेश खुटाळे यांचे सुपुत्र आहेत. त्यांनी मास्टर इन फिजिओथेरपी (ऑर्थो स्पोर्ट्स) केले आहे.

डॉ. मुकुल खुटाळे यांनी यापूर्वी हॉकी दिल्ली संघ फिजिओथेरपिस्ट म्हणून काम पाहिले असून भारतीय खो - खो संघाच्या फिजिओथेरपीस्ट पदाची जबाबदारी ही यशस्वीपणे पार पाडली आहे.

डॉ. मुकुल खुटाळे यांची महाराष्ट्र संघाच्या फिजीओथेरपीस्ट पदी नियुक्ती झाल्याबद्दल आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, आ. दीपकराव चव्हाण, श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबाळकर, महाराष्ट्र खो - खो असोसिएशनचे अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या सह विविध स्तरावरील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# शानभाग विद्यालयाच्या खेळाडूंची राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड

**सातारा : प्रतिनिधी**

येथील श्याम सुंदरी रिलीजियस अँड चॅरिटेबल सोसायटीच्या के. एस.डी.शानभाग विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेजच्या तीन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय आर्चरी म्हणजेच धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सोलापूर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये विद्यालयाचा इयत्ता दहावी मध्ये शिकणारा युवराज प्रवीण चव्हाण हा सेकंड रँक ने निवडला गेला तसेच इयत्ता नववी ब मध्ये शिकणारा शारीर राजेंद्र माने याची तिसऱ्या रँक साठी निवड झाली आणि इयत्ता आठवी अ मध्ये शिकणाऱ्या कु सिद्धी शिवाजी पाटील या मुलीची चौथ्या रँक साठी निवड करण्यात आली आहे.




**प्रशिक्षकांत समावेत राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड झालेले के. एस. डी .शानभाग विद्यालयाचे खेळाडू. ( छाया : अतुल देशपांडे, सातारा)**

या खेळाडूंना विद्यालयाचे प्रशिक्षक आणि मार्गदर्शक धनश्री जाधव यांचे प्रशिक्षण लाभले या निवडीबद्दल तसेच या तिघांनी केलेल्या अतिशय नेत्रदीपक कामगिरीबद्दल के.एस.डी. शानभाग विद्यालय आणि जुनियर कॉलेजचे संस्थापक व ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक रमेश शानभाग ,संस्थेच्या संचालिका सौ. आंचल घोरपडे, विद्यालयाच्या तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका आणि प्राचार्य सौ .रेखा गायकवाड प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भाग्येश कुलकर्णी तसेच पालक संघाचे अध्यक्ष ,प्रतिनिधी, शिक्षक, शिक्षिका व पालकांनी या यशाबद्दल कौतुक करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जोरदार वाऱ्यामुळं सांगलीत दोन एकर द्राक्ष बाग कोसळली, शेतकऱ्याचं १५ लाखांचं नुकसान

**सांगली : प्रतिनिधी**

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील खरशिंगमध्ये जोरदार वाऱ्यामुळं दोन एकर द्राक्ष बाग कोसळली आहे. यामुळं शेतकऱ्यांचे १५ लाख रुपयांच्या आसपास नुकसान झालं आहे. महादेव रंगराव जगताप असे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्याचे नाव आहे. सकाळी साडेसातच्या दरम्यान जोरदार वाऱ्यानं बागेच्या आत शिरकाव केला आणि बघता बघता बाग खाली कोसळली.

ही द्राक्ष काही दिवसातच निर्यात करण्यात येणार होती. मात्र, त्यापूर्वीच बाग कोसळल्यानं शेतकऱ्याचं मोठं नुकसान झालं आहे. कवठेमहांकाळ तालुक्यातील बनेवाडी गावातील महादेव रंगराव जगताप यांची खरशिंग हद्दीमध्ये दोन एकर क्षेत्र द्राक्ष बाग होती. पुढच्या आठ ते दहा दिवसात द्राक्ष बाग सुरू होणार होती. अतिशय परिश्रम घेवून जगताप यांनी यावर्षी बाग



चांगली जोपासली होती. सकाळी साडेसात वाडण्याच्या दरम्यान जोरदार वाऱ्याने बागेच्या आत शिरकाव केला. बघता बघता एका झपाट्यात बाग खाली कोसळली. बाग कोसळल्यानं शेतकरी फार मोठ्या संकटात सापडला आहे. कोसळलेली द्राक्ष बाग पाहून शेतकरी रडू लागला. यामध्ये शेतकऱ्याचे १५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.महादेव जगताप यांच्या कुटुंबावर दुःखाचे सावट निर्माण झाले आहे. त्यांनी सोसायटीतून पाच ते सहा लाख रुपयांचे तसेच बँकेतून सात लाख रुपयांचे कर्ज काढून द्राक्ष बाग लावली होती. सलग दोन वर्षे त्यांना द्राक्ष उत्पादन कमी आले होते. पण यावर्षी त्यांनी बागेकडे चांगले लक्ष दिलं होतं. बागेला मालही बरा होता. अत्यंत गरिबीतून कष्ट करुन त्यांनी कर्ज काढून त्या बागेला सांभाळले होते. मात्र, क्षणार्धात होत्याचं नव्हतं झालं. वाऱ्यामुळं त्यांच्या दोन एकर बागेचं मोठं आर्थिक नुकसान झालं आहे.

**बदलत्या वातावरणाचा शेती पिकांना फटका**

आधीच राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कधी थंडी तर कधी ढगाळ वातावरण निर्माण होत आहे. या बदलत्या वातावरणाचा मोठा फटका शेतकऱ्यांच्या पिकांना बसत आहे. पिकांवर रोगराई पडत असल्यानं शेतकऱ्यांना त्यावर फवारण्या कराव्या लागतात. या फवारण्याचा मोठा खर्च असतो. कारण फवारणी करण्यासाठी लागणारी औषधे महाग असतात. यामुळं शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

पाकिस्तानची हलाखी आणि लाचारी

# आयएमएफने कठोर अटींवर कर्ज दिले; पण दुसरा पर्यायही नाही

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी कबूल केले आहे की, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने १.२ अब्ज डॉलरच्या तिसऱ्या टप्प्याचे कर्ज देण्यासाठी अत्यंत कठोर अटी घातल्या आहेत. शरीफ म्हणाले- आयएमएफने ठेवलेल्या अटी आमच्या अपेक्षेपेक्षा जास्त कठोर आणि धोकादायक आहेत, पण काय करावे? आमच्याकडे दुसरा पर्यायही नाही.

शरीफ यांच्या विधानाच्या खोलात जाण्यापूर्वी पाकिस्तानची अत्यंत बिकट अर्थव्यवस्था समजून घेणे आवश्यक आहे. फॉरेक्स रिझर्व्ह (परकीय चलनसाठा) फक्त ३.१ अब्ज डॉलर शिल्लक आहे. यापैकी ३



अब्ज डॉलर सौदी अरेबिया आणि यूएईचे आहेत. हे गॅरंटी डिपॉझिट आहेत, याचा अर्थ ते खर्च केले जाऊ शकत नाहीत.

गुरुवारी महागाई दर २७.८% वर पोहोचला. सप्टेंबर २०२२ मध्ये विदेशी कर्ज १३०.२ अब्ज डॉलर होते. त्यानंतर ही आकडेवारी जाहीर झाली नाही. डॉलरच्या तुलनेत रुपया (पाकिस्तानी चलन) २७४ झाले आहे.


शाहबाज शरीफ एका टीव्ही चॅनलवर म्हणाले- मी तपशील तर सांगू शकत नाही, परंतु मी नक्कीच म्हणेन की आपल्या अर्थव्यवस्थेची स्थिती तुमच्या कल्पनेच्या पलीकडे आहे. खचऋ्ने कर्जासाठी अतिशय कठोर अटी घातल्या आहेत, पण त्या स्वीकारण्याशिवाय आमच्याकडे दुसरा पर्याय नाही. शरीफ यांच्या विधानाची वेळ महत्त्वाची आहे. खचऋ टीम ३१ जानेवारीला इस्लामाबादला पोहोचली आणि ९ फेब्रुवारीपर्यंत तिथे राहील. कर्जाचा हप्ता सोडण्यापूर्वी आयएमएफला अनेक अटी पूर्ण करून घ्यायच्या आहेत.

# अमेरिकन एअरबेसवर चिनी बलून : पेंटागॉनचा दावा - हेरगिरीसाठी पाठवला

**वॉशिंग्टन : वृत्तसंस्था**

अमेरिकेच्या मोंटाना शहरात चीनचा संशयास्पद हेर बलून दिसला आहे. मोंटानामध्ये अमेरिकन हवाईदलाचा स्पेशल बेस आहे. तेथून आंतरखंडीय क्षेपणास्त्रांचे संचलन केले जाते. संपूर्ण अमेरिकेत असे ३ हवाईतळ आहेत. अमेरिकन संरक्षण मंत्रालय पेंटागॉनचे प्रेस सचिव पॅट रायडर म्हणाले की, चीनचा हेर बलून नॉर्थ वेस्टर्न सिटी मोंटानात दिसून आला. हा बलून अमेरिकेच्या हेरगिरीसाठी पाठवण्यात आला होता.

हा बलून किती उंचीवर उडत होता, हे अधिकाऱ्यांनी सांगितले नाही. पण तो सिव्हिलियन एअर ट्रॅफिकच्या वर व आउटर स्पेसच्या खाली उडत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विशेष बाब म्हणजे अमेरिकन परराष्ट्र मंत्री अँटोनी ब्लिंकन यांच्या चीन दौऱ्याच्या १ दिवस अगोदर हा बलून दिसून आला आहे. ब्लिंकन ५



व ६ फेब्रुवारी रोजी चीनच्या दौऱ्यावर जाणार आहेत.

अमेरिकन अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या बलूनचा त्यांच्या लष्कराला कोणताही धोका नाही.

चीनने मोबाइल टॉवरवर हुवावेचे हेरगिरी डिव्हाइस लावण्याचा कट रचला होता. त्यामाध्यमातून मिटवेस्टच्या लष्करी ठिकाणांची हेरगिरी करण्यात येत होती. हे डिव्हाइस ओबामांच्या काळात लावण्यास सुरुवात झाली होती.

चीनने अमेरिकेच्या ग्रामीण भागांना लक्ष्य करत तिथे आपले डिव्हाइस लावले होते. तेथून ते लष्करी ठिकाणांकडे लावण्यात येत असताना गुप्तहेर संघटनांना त्याचा संशय आला. त्यानंतर त्यावर तत्काळ कारवाई करण्यात आली. अमेरिकन संसदेने ग्रामीण भागातून ही उपकरणे काढून टाकण्यासाठी २०२० मध्ये १५ हजार रुपये मंजूर केले होते.

पेंटागॉनच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, हा बलून काही दिवसांपूर्वी चीनहून अलास्कालगतच्या अलेउतियन आयलँडवर आला होता. तेथून नॉर्थ वेस्ट कॅनडामार्गे तो मोंटाना शहरात पोहोचला.

संरक्षण मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, हा बलून प्रदिर्घ काळ देशात राहू शकतो. पण त्यापासून लष्करी किंवा शारीरिकि प्रकारचा कोणताही धोका नाही. त्याचा एक्सेसही मर्यादित आहे. त्यामुळे त्यापासून गोपनीय माहिती गोळा करण्याचीही फारशी शक्यता नाही.

# अदानींना धक्के सुरूच, मूडीजचा मोठा निर्णय

## अदानी ग्रुपच्या आर्थिक स्थितीचं मूल्यांकन करणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अमेरिकेतील हिंडेनबर्ग रिसर्च इन्वेस्टिगेटीव अँड रिपोर्टिंग संस्थेच्या अहवालानंतर भारतीय उद्योगपती गौतम अदानी यांना मोठा धक्का बसला आहे. हिंडेनबर्ग संस्थेचा अहवाल २४ जानेवारीला प्रसिद्ध झाला होता. तेव्हापासून गौतम अदानींच्या संपत्तीतमध्ये मोठी घट झाली आहे. विदेशी वित्तीय संस्थांकडून अदानी यांच्या कंपन्यांबद्दल सावध पावलं उचलली जात आहेत. अदानी उद्योग समुहातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण सुरु आहे, त्यापार्श्वभूमीवर फिच यांसस्थेनंतर जागतिक एजन्सी मूडीजनं देखील त्यांचा अहवाल जारी केला आहे. मूडीजच्या अहवालात हिंडेनबर्गच्या रिपोर्टनंतर ते अदानी ग्रुपच्या आर्थिक लवचिकतेचं मूल्यांकन करत असल्याचं सांगण्यात आलं आहे. मूडीजच्या आयसीआरए या एजन्सीकडून अदानी समुहासंदर्भात सध्या घडलेल्या घटनाक्रमांवर लक्ष ठेवून आहोत आणि मूल्यांकन करत आहोत असं सांगण्यात आलं आहे.

अदानी ग्रुपकडे २०२५ पर्यंत कर्ज परतफेड करण्याची संधी आहे. त्यामुळं आगामी १ ते २ वर्षांच्या कालावधीत कर्ज परतफेड करण्यासंदर्भात अदानी ग्रुपची क्षमता कमी होण्याची शक्यता असल्याचं सांगण्यात आलं आहे.



दुसरीकडे फिचनं त्यांच्या अहवालात हिंडेनबर्ग रिपोर्टनंतर देखील अदानी ग्रुपच्या क्रेडिट प्रोफाइलवर तात्काळ प्रभाव झाला नाही, असं सांगितलं होतं. मात्र, मुडीजनं सध्या अदानींना निधी उभारण्यास अडचण येऊ शकते त्यामुळं अदानींच्या आर्थिक स्थितीचं अवलोकन केलं जाईल, असं म्हटलं.

हिंडेनबर्गचा अहवाल २४ जानेवारीला समोर आल्यानंतर अदानी समुहाच्या मालकीच्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण होत आहे.. अदानी ग्रुपच्या कंपन्यांची मार्केट कॅप घसरत आहे. गौतम अदानी यांची नेटवर्थ देखील घसरत आहे. गौतम अदानी हिंडेनबर्गचा अहवाल आला तेव्हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती होते. सध्या ते टॉप २० मधून बाहेर फेकले गेले आहेत.

हिंडेनबर्गच्या रिपोर्टनंतर अदानी समुहाच्या शेअर्समध्ये सुरु असलेल्या घसरणीनंतर अमेरिकेतील डाऊ जोन्स सस्टेनिबिलिटीनं इंडेक्समधून अदानी एंटरप्रायझेसच्या शेअर्सला बाहेर काढलं.

गुरुवारी एनएसईनं अदानी एंटरप्रायझेस, अदानी पोर्टस आणि अंबुजा सिमेंट या तीन स्टॉक्सला ॲडिशनल सर्विलान्स मेजर्स अंतर्गत ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलं आहे.